आवाजावरून कर्करोगाच्या लक्षणांचा उलगडा

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : ध्वनिमुद्रणातील आवाजाची वैशिष्ट्ये जसे की, स्वर, स्पष्टता, पट्टी हे स्वरयंत्राच्या कर्करोगाची प्रारंभिक चिन्हे शोधण्यात मदत करू शकतात, असे संशोधकांनी म्हटले आहे.

'फ्रंटियर्स इन डिजिटल हेल्थ' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या निष्कर्षांमुळे आवाजातून व्होकल फोल्डमध्ये असामान्यता किंवा 'विकार' शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मॉडेल विकसित करण्यात मदत होऊ शकते. जखम सौम्य असू शकतात, परंतु स्वरयंत्राचा कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्याचेदेखील प्रतिनिधित्व करू शकतात असे संशोधकांनी सांगितले. यासाठी 'एन्डोस्कोपी' आणि 'बायोप्सी'सारख्या निदान प्रक्रिया प्रभावी आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

'ध्वनिमुद्रणातील डेटासेटस्ह आम्ही 'व्होकल बायोमार्कर' वापरून 'व्होकल फोल्ड' जखम असलेल्या रुग्णांचा आवाज अशा जखम नसलेल्या रुग्णांपासून वेगळे करू शकतो,' असे ॲरिझोना हेल्थ ॲंड सायन्स युनिव्हर्सिटीमधील 'क्लिनिकल इन्फॉर्मेटिक्स'चे पोस्टडॉक्टरल फेलो लेखक डॉ. फिलिप जेनकिन्स म्हणाले.

संशोधकांच्या चमूने सार्वजनिकरीत्या उपलब्ध 'ब्रिज टू एआय व्हॉइस' डेटासेटवरून घेतलेल्या ३०६ सहभागींच्या १२,५०० पेक्षा जास्त ध्वनिमुद्रणाच्या स्वर, आवाज आणि स्पष्टतेचे विश्लेषण केले. ध्वनिमुद्रणातील एकूण नमुन्यांमध्ये एप्लाएआर (हार्मोनिक-टू-आवाज गुणोत्तर) आणि सौम्य जखम आणि निरोगी नियंत्रणे आणि स्वरयंत्राचा कर्करोग या दोन्हीमधील मूलभूत वारंवारतामध्ये लक्षणीय फरक ओळखल्याचे लेखकांनी लिहिले.



डॉ. मानसी डॉ. पुष्कराज
Tanvi HERBALS क्लिनिक
सर्दी ? कफ ?
नाक गळतय ?
फ्री चेकअप कॅम्प - ठाणे
आज बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी
9833683021 | 9920149535

भिवंडीत भाजप नेत्याची हत्या

प्राणघातक हल्ल्यात चुलत भावाचाही मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : भिवंडीत भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षाची आणि त्याच्या चुलत भावाची कार्यालयात शिरून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. प्रफुल्ल तांगडी आणि तेजस तांगडी अशी मृतांची नावे आहेत. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात १२ संशयितांविरोधात गुन्हे दाखल असून पोलिसांनी तिघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले.

भिवंडी तालुक्यातील पायेगाव येथील खार्डी या गावात प्रफुल्ल तांगडी हे त्यांच्या कुटुंबियांसोबत राहायचे. त्यांचा जे.डी.टी. या नावाने रियल इस्टेटचा व्यवसाय होता. सोमवारी रात्री ११ रात्री वाजता प्रफुल्ल आणि तेजस हे कार्यालयात असताना, दोनजण चेहऱ्याला रूमाल बांधून त्यांच्या कार्यालयाजवळ आले. त्यांनी प्रफुल्ल आणि तेजस यांच्यासोबत वाद घालून त्यांच्यावर तलवारी, सुऱ्याने वार करण्यास सुरुवात केली. तसेच त्यांनी तेजस यांच्यावर देखील हल्ला केला. त्यानंतर हल्लेखोरांनी तेथून पळ काढला. प्रफुल्ल आणि तेजस हे दोघेही कार्यालयाबाहेर जखमी अवस्थेत पडले होते. घटनेची माहिती प्रफुल्ल यांच्या नातेवाइकांना मिळताच, त्यांनी दोघांना खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले.

शहरात तणाव

प्रफुल्ल यांच्या हत्येचे वृत्त पसरताच भाजपचे भिवंडी पश्चिम मतदारसंघाचे आमदार महेश चौघुले, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रफुल्ल यांच्या नातेवाइकांनी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेतली. तसेच आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या दुहेरी हत्याकांडानंतर भिवंडीत तणावाचे वातावरण निर्माण झाले.

तांगडी कुटुंबावर दुःखाचा डोंगर

प्रफुल्ल हे त्यांचे आई-वडिल, पत्नी श्रद्धा, मुलगा कुशांक (७७) आणि कुश (९२) यांच्या सोबत वास्तव्यास होते. रविवारी कुश याचा वाढदिवस असल्याने प्रफुल्ल यांची कुटुंबासोबत मुंबईतील एका तारांकित हॉटेलमध्ये कुशचा वाढदिवस साजरा केला होता. परंतु, दुसऱ्याच दिवशी त्यांची हत्या झाल्याने तांगडी कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

कांदिवलीतील तलावात बुडून पिता-पुत्राचा मृत्यू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : खेकडे पकडण्यासाठी गेलेल्या पिता-पुत्राचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना कांदिवली पूर्वेत बोईसर नाल्याजवळ घडली. याप्रकरणी कुरार पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

एकनाथ पाटील (५०) हे कांदिवली पूर्व येथील क्रांतीनगरमधील जय बजरंग चाळीत राहात होते. शनिवारी संध्याकाळी ते मुलगा वैभव पाटील (१२) याच्याबरोबर कांदिवली पूर्व येथील बोईसर नाल्याजवळील हरिची बावडी तलावात खेकडे पकडण्यासाठी गेले होते. मुलगा वैभव खेकडे पकडत असताना पाय घसरून तलावात पडला. त्याला वाचविण्यासाठी त्याचे वडील एकनाथ तलावात उतरत असताना तेही तलावात पडले. त्यांना वाचविण्यासाठी आसपास कुणीही नसल्याने दोघेही तलावत बुडाले. या घटनेची माहिती वनरक्षकाने पोलीस आणि अग्निशमन दलाला दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी नाल्यातून दोघांचे मृतदेह बाहेर काढले.

उद्या सुरू होत आहे
नॅशनल सिल्क एक्स्पो
विणकरांचे थेट प्रदर्शन आणि विक्री
लग्न आणि उत्सव विशेष
१४ ते १८ ऑगस्ट
वर्ल्ड ट्रेड सेंटर
कफ परेड, मुंबई
संपूर्ण भारतातील १५०+ प्रमाणित विणकर आणि सर्वोत्तम डिझायनर्स
संपूर्ण भारतातून फक्त विणकरांच्या किमतीत अस्सल आणि शुद्ध रेशीम आणि कॉटनच्या साड्या
सर्व नवीनतम विविधता आणि नवीन डिझाइन
सिल्क आणि कॉटन साडी । ड्रेसवर पोशाख । एथनिक वेअर
कुर्ती आणि ड्रेसेस । फॅशन ज्वेलरी हँडक्राफ्टेड टेक्सटाईल्स
UP TO 50% DISCOUNT
M: 9412258826 | Entry Free | All UPI Online / Debit & Credit Cards Accepted

शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे आंदोलन स्थगित

पुणे : 'संघटनेच्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार करून पोलीस विभागाला शासन स्तरावरून कळवण्यात येईल, निरपराध अधिकारी, कर्मचाऱ्यांवर चुकीची कारवाई होणार नाही,' असे आश्वासन देण्यात आल्यानंतर अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाने आंदोलन स्थगित केल्याचे जाहीर केले असून, अधिकाऱ्यांना बुधवारपासून (१३ ऑगस्ट) पुन्हा कामावर रुजू होण्याचे आवाहन करण्यात आले. पुण्यात सामूहिक रजा आंदोलन करणाऱ्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या मागण्यांबाबत अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाचे पदाधिकारी, शिक्षणमंत्री दादा भुसे, प्रधान सचिव रणजितसिंग देओल यांची मंगळवारी मुंबईत बैठक झाली.

कथित बांगलादेशी नागरिकाला जामीन नाकारला

मुंबई : एखाद्या व्यक्तीकडे केवळ आधार, पॅन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र आहे म्हणून ती व्यक्ती भारतीय नागरिक होत नाही, अशी टिप्पणी उच्च न्यायालयाने मंगळवारी केली. तसेच, बेकायदेशीररीत्या भारतात प्रवेश केल्याचा आणि बनावट कागदपत्रांसह गेल्या दहा वर्षांपासून येथे वास्तव्यास असल्याचा आरोप असलेल्या बाबू अब्दुल रौफ सरदार याला जामीन नाकारला.

आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदार ओळखपत्र यासारखी कागदपत्रे केवळ ओळख पटविण्यासाठी किंवा सेवा मिळविण्यासाठी आहेत, अशीही न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने याचिकाकर्त्याला जामीन नाकारताना स्पष्ट केले. बाबू अब्दुल रौफ सरदार हा बांगलादेशी नागरिक असून येथे बनावट कागदपत्रांसह राहत होता.

दहीहंडी दुर्घटनेतील महेशचे कुटुंबीय मदतीपासून वंचित

आईचे बँक खाते, आधारकार्ड नसल्याने अडचण

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : दहिसरमध्ये थर रचण्याचा सराव करताना मृत्युमुखी पडलेल्या महेश जाधव (११) या मुलाच्या कुटुंबीयांना आमदार प्रकाश सुर्वे यांनी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. मात्र त्याच्या आईकडे आधार कार्ड किंवा बँक खाते नसल्याने ही मदत देता आली नाही. दरम्यान, या दुर्घटनेनंतर नवतरुण मित्र मंडळाने यंदाचा आपला उत्सव रद्द केला आहे.



मदत आईलाच देण्याचा निर्णय

महेश जाधव हा गणोली ४-५ वर्षांपासून नवतरुण मित्र मंडळाच्या दहीहंडी पथकात सहभागी होत होता. गणोली वर्षी त्याने या पथकातर्फे दहीहंडी फोडली होती. त्याला तीन लहान भाऊ आहेत. त्याची आई घरकाम करते, तर वडील मजुरी करतात. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून ते धारखडी येथे भाड्याच्या घरात राहतात. या दुर्घटनेनंतर स्थानिक आमदार प्रकाश सुर्वे यांनी महेशच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. ही मदत त्याच्या आईच्या नावावर देण्याचे ठरवले होते.

ना आधार कार्ड, ना बँकेत खाते

महेशच्या कुटुंबीयांना मदतीचा धनादेश देण्यासाठी सुर्वे यांनी त्याच्या आईची भेट घेतली. मात्र महेशची आई संगिता जाधव यांचे बँकेत खातेच नव्हते. तसेच आधार कार्ड, पॅनकार्ड आणि मोबाइलही नव्हता. यावर तोडगा काढण्यासाठी महेशच्या आईच्या नावाने आधारकार्ड, पॅनकार्ड बनविण्यात येणार आहे. त्यांचे आधारकार्ड आणि पॅन कार्ड तयार झाल्यानंतर बँकेत खाते उघडण्यात येईल आणि त्यानंतर हा धनादेश सुपूर्द केला जाणार आहे, अशी माहिती शिवसेना (शिंदे) शाखाप्रमुख प्रकाश पुजारी यांनी दिली.

दहिसरच्या केतकीपाडा येथील नवतरुण मित्र मंडळाचे गोविंदा गेल्या काही दिवसांपासून दहीहंडी उत्सवाची तयारी करीत होते. रविवारी सराव सुरू असताना महेश जाधव सहाव्या थरावरून खाली कोसळला. त्याला झेलण्यासाठी कुणी नसल्याने तो जमिनीवर पडला आणि त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

MCXCCL
मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एक्स्चेंज स्क्वेअर, सीटीएस २५५, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३
ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com | दूरध्वनी: +९१-२२-६८६४ ६०००
सी आय एन: U74999MH2008PLC185349

सतराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारा सूचित करण्यात येते की, कंपनीची सतरावी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) दिनांक ३० जुलै २०२५ च्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("VC") / इतर दूक-श्राव्य माध्यम ("OAVM") द्वारा सोमवार, ०८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता घेण्यात येणार आहे. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार एजीएम VC / OAVM द्वारा आयोजित केली जाईल.

उल्लेखित परिपत्रकांच्या अनुसार, एजीएम सूचना आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक अहवालासह १२ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कंपनीकडे नोंदणी केलेल्या ईमेल पत्त्यांवर पाठविण्यात आली आहे. एजीएम सूचना कंपनी संकेतस्थळ https://www.mcxccl.com/disclosures/announcement वर उपलब्ध आहे आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळ https://www.mcxccl.com/disclosures/financial-results वर उपलब्ध आहे. एजीएममध्ये उपस्थित राहण्याच्या सूचना या एजीएम सूचनेमध्ये दिल्या आहेत.

एजीएममध्ये व्यवहार करण्याच्या व्यवसायाच्या कामकाजासंबंधित कागदपत्रे बैठकीच्या तारखेपर्यंत तपासणीसाठी उपलब्ध असतील.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव
ठिकाण: मुंबई
दिनांक: १२ ऑगस्ट २०२५

'झोपु'ची सक्ती झालेल्या संस्था न्यायालयात!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची सक्ती झालेल्या चरईतील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या मालकी हक्काच्या नऊ गृहनिर्माण संस्थांतील रहिवाशांनी अखेर न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयाने ही याचिका दाखल करून घेतली आहे. या गृहनिर्माण संस्थांनी महापालिकेकडे सादर केलेला समूह पुनर्विकासाचा प्रस्ताव मंजूर झाला असता, तर दुप्पट अतिरिक्त क्षेत्रफळाचा लाभ मिळाला असता. परंतु पालिकेने झोपु योजनेसाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' दिल्यामुळे आता या रहिवाशांना कमी क्षेत्रफळाच्या सदनिका मिळणार आहेत.

चरळी येथे नारायण पुजारी नगर हा महापालिकेच्या मालकीचा २३ हजार १८३ चौरस मीटर भूखंड असून पालिकेने भुईभाड्याने दिलेल्या भूखंडावर महापालिका अधिकाऱ्यांना मालकी हक्काने दिलेल्या १६४ सदनिका असलेल्या नऊ इमारती आहेत. या इमारती ५५ वर्षे जुन्या असून विकास नियंत्रण नियमावली ३३(९) म्हणजेच समूह पुनर्विकासासाठी नऊ इमारती एकत्रित करून 'होरायझन फेडरल सहकारी गृहनिर्माण संस्थे'ची स्थापना करून २०१४ मध्ये प्रस्ताव सादर केला होता. हा परिसर सागरी हद्द नियंत्रण कायद्याअंतर्गत येत असल्याचे कारण देत या प्रस्तावावर पालिकेने काहीही निर्णय घेतला नाही. आता या भूखंडाशेजारी असलेल्या झोपडपट्टीचा पुनर्विकास करीत असलेल्या विकासकांनी हा भूखंड झोपु योजनेशी संलग्न करण्याची मागणी केली. झोपु प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तसा प्रस्ताव पालिकेला पाठवला. पालिकेने या प्रस्तावासाठी तात्काळ 'ना हरकत प्रमाणपत्र'ही देऊन टाकले. या बाबतचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रसिद्ध केले होते. आता या रहिवाशांना झोपु योजनेत समाविष्ट व्हावे लागणार आहे.

> एखादा भूखंड ५१ टक्के झोपडधारी व्यापलेला असेल तर शेजारील सरकारी भूखंड झोपु योजनेशी संलग्न करता येतो, असे नियमावलीतच स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे पालिकेने दिलेले 'ना हरकत प्रमाणपत्र' नियमानुसारच आहे.
> **-भूषण गगराणी**, पालिका आयुक्त

कसाऱ्यातील दुचाकीस्वारांचा अपघाती मृत्यू

ठाणे : मुंबई- नाशिक महामार्गावर दुचाकीवर निघालेल्या तीन मित्रांचा अपघातात मृत्यू झाला. विशाल झुगरे, गणेश झुगरे आणि प्रकाश कवदे अशी मृतांची नावे आहेत. या प्रकरणी भरधाव दुचाकी चालविल्याने गणेश याच्याविरोधात कसारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

कसारा येथील लतिफवाडी परिसरात गणेश, विशाल आणि प्रकाश हे राहायचे रक्षाबंधनाच्या दिवशी ते एकाच दुचाकीवरून मुंबई- नाशिक महामार्गावरील वशाळा पूल येथे जात होते. दरम्यान, वशाळा येथे पुलाचे काम सुरू असल्याने याठिकाणी उभारण्यात आलेल्या अडथळ्याला त्यांची दुचाकी धडकली. त्यामुळे तिघेजण डोक्याला गंभीर दुखापत झाली.

त्यांना कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यांना पुढील उपारासाठी इतर रुग्णालयांत दाखल करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. त्यापैकी गणेशचा घोटी ग्रामीण रुग्णालयात, तर विशालचा वटेतच, तर प्रकाश यांचा नाशिक जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला.

दृष्टिकोनच देतो व्यक्तिमत्त्वाला आकार
लोकसत्ता
जाणत्या जनांसाठी
लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

सॅनिटरी कचरा महापालिकेला देणे बंधनकारक

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : महापालिकेच्या घनकचरा विभागातर्फे 'घरगुती सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचऱ्यांचे संकलन' सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. ही सेवा आता मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांसाठी अनिवार्य केली आहे. त्यामुळे अशा आस्थापनांनी या सेवेसाठी नोंदणी करून त्यांच्याकडील घरगुती सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचऱ्याचे वर्गीकरण करून ते पालिकेकडे सुपूर्द करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

कचरा संकलन सेवेचा लाभ घेण्यासाठी एकूण ३ हजार ५३६ आस्थापनांनी नोंदणी केली आहे . त्यांच्याकडून आतापर्यंत सुमारे २०२ टन कचरा संकलित केला आहे .

या कचऱ्याच्या संकलनासाठी नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था, निवासी संकुल, ब्यूटी पार्लर, महिला वसतिगृह, शैक्षणिक संस्था आदी आस्थापनांना 'पिवळ्या कचरापेटी'चे वितरण करण्यात येणार आहे. या सेवेत सहभागी होण्यासाठी क्युआर कोड पाठवून नोंदणीची सोय केली आहे.



संबंधित कचरा संकलनासाठी येत्या ९८ ऑगस्टपासून नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था, निवासी संकुल, ब्यूटी पार्लर, महिला वसतिगृह, शैक्षणिक संस्था आदी आस्थापनांना 'पिवळ्या कचरापेटी'चे वितरण करण्यात येणार आहे. यासाठी https:// docs. google. com/ forms/ d/ e/1FAIpQLSc6 zR8 XHoOzXRNanCCdj4oKtS27 Ju7 vuaXBANiCGoKCfUCn5 g/viewform या लिंकवर जाऊन नोंदणी करावी लागेल.

- किरण दिघावकर, उपायुक्त